म. ग्रं. सं. ठाणें

विषय ९६६
इतिहास

ग्रहालय क्रमांक

लेखक नारायण पांडुरंग कुलकर्णी

सन १८५९

पुस्तकाचें नांव श्रीगोपगडमाणी अथवा ग्वाल्हेर किल्ला व मराठे, पेशवे, शिंदे यांचा संक्षिप्त इतिहास

९६६
इति.

म. ग्रं. सं. ठाणें
इतिहास
१५
१८
ठाणे

# मणि

अथवा

## वाल्हेर किल्ला व मराठे, पेशवे, शिंदे

ह्यांचा

# संक्षिप्त इतिहास.

हें पुस्तक,

**नारायण पांडुरंग कुळकर्णी**

मा. चिटणीस तहशील परगणे पोरसा

जि॰ तवरधार स्टेट ग्वाल्हेर

ह्यांनीं केलें तें

बडोदें येथें पूर्णचंद्रोदय छापखान्यांत छापिलें.

किंमत चार आणे.

मराठी ग्रंथ संग्रहालय
ग्रं. नं. [illegible]
ता. ........
ठाणे.

... ग्रंथ संग्रहालय ...
... नं. २६८
ना. ....

# श्रीगोपगडमणि

अथवा

# ग्वाल्हेर किल्ला व मराठे, पेशवे, शिंदे ह्यांचा संक्षिप्त इतिहास.

हें पुस्तक,

**नारायण पांडुरंग कुळकर्णी**

मा. चिटणीस तहशील परगणे पोरसा

जि० तवरधार स्टेट ग्वाल्हेर

ह्यांनीं केलें तें.

बडोदें येथें **पूर्णचंद्रोदय** छापखान्यांत छापिलें.

सन १८९७.

किंमत चार आणे.

( सर्व हक्क ग्रंथकर्त्यांनीं आपल्या स्वाधीन ठेविले आहेत. )

मराठी ग्रंथ संग्रहालय
नं. ........
ता. ........
ठाणे.

# आर्या.

सरभंगनाथसद्गुरु,-पदनत अण्णा स्वरूप-अवधूत ॥
यत्पदकृपेंचि दावी, मंगल यतिलाहि सूर्य विधुवधुंत ॥ १ ॥
त्या पदपंकजकोशीं, मममानसअलि सदैव बंधन हो ॥
प्रल्हाद जसा हरिपदिं, किंवा हरपदिं मृकंडु-नंदन हो ॥ २ ॥
कर्ता, कारण, कार्यहि, तूंचि विभो स्वेच्छकेलि खगपृष्ठीं ॥
नारायणसुमनानें, द्विजकरिला करिशि कांन गतकष्टी ॥ ३ ॥
नतदासकृती गौरव, करणें शास्त्रार्थ बोलले सुकवी ॥
श्रीमद्भागवतीं तो, प्रकटचि अज्ञानसागरा सुकवी ॥ ४ ॥
अस्तु, श्रीपदिं अर्पण, केला स्वीकार त्या विदुरकणिचा ॥
कीजे तत्सम शुभदा, प्रेमभरें अल्प गोपगड--मणिचा ॥ ५ ॥

# अभिप्राय.

I have read through and partly revised the श्रीगोपगडमणि of the bearer Mr. Narayan Pandurang Kulkarni. This piece, originally only a part of a bigger work entitled the सखीसंवाद नाटिका, has for several reasons been separated from the present book, and now consists of two portions, the first श्रीगोपगड giving a short history of the Gwalior Fort in prose, and the second मणि detailing in any easy metric form the principal events in the lives of the Satara Rajas, the Poona Peishwas, and the Gwalior Scindias. The book in my opinion deserves patronage.

BARODA 18-1-97.

SHANKAR MORO RANADE.

## अर्पणपत्रिका

श्रीमंत सरकार

**माधवराव महाराज साहेब शिंदे,**

अलिजा बहादूर दामइक्बालहूमुल्कहू

चरण--कमलीं

हा ग्रंथ

विनम्रभावें नजर केला असे.

आज्ञाधारक,

**नारायणराव पांडुरंग कुळकर्णी.**

मा. चिटणीस तह० परगणा पोरसा

जि. तवरधार स्टेट ग्वाल्हेर.

# प्रस्तावना.

वाचकहो, हें भरतवर्ष परराष्ट्रीयांच्या तडाक्यांत सांपडून दिवसेंदिवस वाढत्याप्रमाणानें निर्धनावस्थेंत कालक्षेप करीत आहे. त्यांतही, 'श्रीनिवास' व, 'नाविष्णुः पृथ्वीपतिः' या उभयालंकारांनीं युक्त असे जे भाग विद्यमानकाळीं दुंदुभीरवयुक्त आहेत, त्यांची संख्या खरोखर हाताच्या बोटांइतकीही नाहीं. हर! हर! तथापि, भवानीयुक्त ज्याचा कर; शरणागतरक्षक ज्याचें पद; गोहत्यादि दुष्कृतिपटुजनांचा समूळ नाश करण्याविषयीं जो सदैव बद्धपरिकर; दुष्ट यवनांच्या काळदाढेसमान शस्त्रांसही दाद न देणारें वज्रमय चिलखत ज्याच्या देहीं वास करणारें; परस्त्रीमातेसमान असा ज्याचा भाव; गोसुरविप्रपदीं नम्र ज्याची मणियुत कंधरा; आणि श्रीमद्रामदासगुरुपदारविंदीं मिलिंदायमान ज्याचें तन, मन, धन; अशा त्या छत्रपति शिवाजी महाराजांच्या प्राचीन साम्राज्याच्या शिंदे, होळकर व गायकवाड या आधुनिक श्रीवरदत्रिमूर्ति दर्शक होत. ह्यांतील आद्य श्री. राणोजीराव शिंदे, ह्यांच्या वंशांतील कुलभूषण, वीरावतंसोत्तम श्री. माधवराव म० सा० ह्यांचा अधिकारोत्सवदिन (ता. १५ डिसेंबर सन १८९४ इ०) ह्या भरतखंडांतील हिंदु ज्ञातीयांस महानंददायक होय. अशा ह्या सुदिनीं सेवक नात्यानें अभिनंदन प्रदर्शित करण्याच्या उद्देशानें प्रजाजनशिशूंच्या महाराष्ट्रभाषाभ्यसनांत उपयुक्त

सखीसंवाद नाटिका नामक ग्रंथ रचिला. त्यांत भरतवर्षाची प्राचीन व अर्वाचीन स्थिति; तत्कालीन देश, शहरें; हल्लीं झालेलें त्यांचें नामांतर; इंद्रप्रस्थ ( दिल्ली ) येथें युधिष्ठिरापासून अखेर अखेर यवन बादशाहांपावेतों झालेले राजे; गोपगड व त्यावर झालेले राजे; व्यावहारिक ज्ञानदर्शक बालोपदेश; व मणि ( मराठे, पेशवे, शिंदे इतिहास वर्णन काव्य) हीं प्रकरणें लेखनावश्यकसाधन—पात्रता करूपून लिहिलीं. द्रव्याभावामुळें हा विस्तृत ग्रंथ आजपर्यंत मला छापून प्रसिद्ध करितां आला नाहीं, याजबद्दल फार दिलगिरी वाटते. तथापि ग्वाल्हेर किल्ल्याचा इतिहास फार मनोरंजक असून तो आजपर्यंत प्रसिद्ध झाला नाहीं. तरी तो, व मणिकाव्य हीं प्रकरणें संक्षिप्त छापून प्रसिद्ध करण्याविषयीं कांहीं विद्वान लोकांनीं सूचना केल्यावरून, हें लहानसें पुस्तक छापिलें आहे.

रसिक जनांस रसयुक्तपदार्थ यथेष्ट न मिळाल्यास त्यांची तृप्ति होत नाहीं. तथापि अल्पस्वल्प रुचीवरून त्याची योग्यता पूर्णपणें त्यांच्या अनुभवास येते. पहा—

**श्लोक.**

॥ अतृप्तिपर्याप्तमिति त्यजंति ॥
॥ नस्वादूसूक्तस्यरसंरसज्ञाः ॥
॥ द्राक्षाल्पसारापिनितान्तमिष्टा ॥
॥ जनस्य कस्यास्ति न भोक्तुमिष्टा ॥

तद्वत् या अल्पग्रंथाचें होऊन, तो भक्तकामकल्पद्रुम श्रीमाधव समग्र ग्रंथ छापण्याचा लवकरच योग आणील अशी आशा आहे.

# श्रीगोपगडाचा (ग्वाल्हेर किल्ल्याचा) संक्षिप्त इतिहास.

इ० स० २७५ वे वर्षी मौजा सोहनिया (ग्वाल्हेर शहरापासून १२ मैलांवरील गांव) येथील शूरसेन नामक कछवाह ठाकूर गोपाचलावर शिकारीस्तव आला होता. ह्यास कुष्टरोग फार झाला होता. तो हरिणाचे मागें लागून पळतां पळतां थकला, परंतु तें सांपडलें नाहीं. ठीकच होय; सिद्धाश्रमांतील प्राण्याचा वध करण्याविषयीं उद्युक्त झालेल्या मनुष्याचा मनोरथ कसा पूर्ण होईल? ते उन्हाळ्याचे दिवस असल्यामुळें, अतितृषाक्रांत होऊन शूरसेन जलाचा शोध करूं लागला. त्यावेळीं अरण्यांत त्यास कोणी मनुष्य भेटलें नाहीं. सुदैवेंकरून, ज्या ठिकाणीं श्रीग्वालिपासिद्ध तपश्चर्या करीत ब्रह्मानंदांत निमग्न होते, तेथें ठाकूर आला, व एकदम, नग्न अवधूत अशा स्थितींत सिद्धांस अवलोकन केल्यावर, त्यास किंचित् भय वाटलें. सिद्ध हे ब्रह्मानंदांत निमग्न होते. आतां पुढें काय करावें? अशा विचारांत ठाकूर गोंधळला. परंतु, त्यानें साधूलोकांबद्दल अशा कांहीं गोष्टी ऐकिल्या होत्या कीं, ते जगाचा त्याग करून एकांत अरण्यांत ब्रह्मानंदांत सदैव निमग्न राहून, निरुपद्रवी असतात. या गोष्टींवरून त्यांपैकींच हे आहेत, यांत संशय

नाहीं. कारण जर हे क्रूर असते, तर एव्हांपावेतों असे स्थिर न राहतां माझ्या अंगावर चालून येऊन त्यांनीं माझा खरोखर घात केला असता; असा तर्क त्यानें बांधिला. शेवटीं जें होणें असेल तें होईल, ह्या साधूचे चरणीं लोटांगण घालावें ह्मणजे सर्व संकटें दूर होतील असा दृढ निश्चय करून शूरसेन सिद्धाचे चरणीं दंडासारखा पडला. तेव्हां सिद्धांनीं त्यास विचारिलें कीं, तूं कोण आहेस? व येथें कां आलास? त्यावर ठाकूरानें आपलें नांव, गांव वगैरे सांगून, मी तृषाक्रांत आहें, तरी उदक मिळावें, अशी विनंति केली. श्री सिद्धांनीं आपले जवळचा जाड रुमाल त्याच्या हातीं देऊन, आज्ञा केली कीं, ह्या झाडींतील झऱ्यांत (सूर्यकुंडांत) स्नान करून, रुमालांत पाणी आणावें; त्याप्रमाणें ठाकूर कुंडांत स्नान करून व रुमालांत पाणी भरून सिद्धाजवळ आला, व त्यानें रुमाल सिद्धांच्या हातीं दिला. त्यांतील थोडेसें जल अधर (रुमाल तोंडास न लावितां) प्राशन करून शेष जल सिद्धांनीं ठाकुरास पिण्यास दिलें. तें त्यानें प्राशन केलें. त्यावेळीं सिद्धांची दृष्टि त्याच्या उघड्या शरीरावर पोंचून रोगाविषयीं त्यास पृच्छा केली. त्यावर ठाकुरानें विनंति केली कीं, मला दोन वर्षांपासून हा कुष्टरोग उद्भवला. यास पुष्कळ उपचार केले; परंतु दुर्दैवामुळें दिवसेंदिवस वृद्धिंगत होत आहे. हें ऐकून सिद्धांस फार वाईट वाटलें. 'सज्जन लोण्याहून मऊ' हें वाक्य खोटें नाहीं, असो. सिद्धांनीं त्यास आज्ञा केली

कीं, येत्या रविवारीं तुम्हीं याच कुंडांत स्नान करावें म्हणजे कुष्ट परिहार होईल. त्यावर ठाकूरानें सिद्धांस साष्टांग नमस्कार घातला. नंतर त्यांची आज्ञा घेऊन तो घरीं आला. सिद्धाज्ञेप्रमाणें पुढील रविवारीं ठाकूर सहकुटुंब सहपरिवार गोपाचलावर येऊन कुंडांत स्नान करून कुष्टविरहित स्वदेहातें पाहता झाला. मग काय सांगावें? हर्षयुक्त होऊन सिद्धांच्या चरणीं रममाण झाला. व त्यानें बहुत दानधर्म केला. तो घरीं जाण्याबद्दल निरोप मागूं लागला. तेव्हां सिद्धांनीं त्यास आज्ञा केली कीं, ज्या कुंडांतील उदकानें रोग परिहार होऊन तुमची काया शुद्ध झाली, तें कुंड विस्तृत करून पक्कें बांधून ह्या गोपाचलावर किल्ला बांधा, व आपल्या कुलास पाल हें नांव ठेवा, हें नांव तुमच्या वंशजांनीं पुढें चालविल्यास ते ह्या गोपाचलावर राज्य करितील. जर उन्मत्त होऊन पाल नांवाचा तिरस्कार करून त्यांनीं दुसरें नांव घेतलें; तर ते तत्काल राज्यभ्रष्ट होतील. हें श्रवण करून ठाकूरानें विनंती केली कीं, महाराज मी एका गांवचा जमीदार असोन द्रव्याभावामुळें किल्ला बांधण्यास असमर्थ आहें. हें ऐकून सिद्धांनीं आपले जवळचा एक बटवा त्यास दिला, व येणेंकरून तुझी कार्यसिद्धि होईल, असें ते ह्मणाले. त्यावेळीं, ह्या बटव्यांत अशा अमूल्य जिनसा काय आहेत? कीं जेणेंकरून मी किल्ला बांधण्यास समर्थ होईन; त्या पाहण्याची ठाकुरास अति उत्कंठा होऊन, त्यानें बटवा उघडून त्यांतून गारगोट्या व

धातूचे तुकडे बाहेर काढिले. ते पाहून त्यास विस्मय झाला. परंतु विचार केला कीं, प्रथम कुंडांत स्नान केलें त्यावेळीं रोग परिहार न होतां, केवळ सिद्धांच्या कृपाप्रसादानेंच तो झाला. तरी ह्यांच्या कृपाप्रसादानेंच किल्ला बांधिला जाईल, यांत संशय नाहीं. नंतर त्या जिनसा बटव्यांत घालून त्यानें तो कमरेस बांधिला; व सिद्धांस साष्टांग नमस्कार घातला. तेव्हां सिद्धांनीं त्याच्या मस्तकावर हस्त ठेवून, त्यास 'सूरजपाल' या नांवानें हांक मारिली. नंतर सिद्ध गुप्त झाले, ते पुन: त्यास दिसले नाहींत. शूरसेन हर्षित होऊन, सज्जनलीलेचें आश्चर्य करीत करीत मंडळीसह गांवीं आला, व त्यानें आपलें सूरजपाल नांव चालू केलें. पुढें कांहीं कालानें सिद्धांच्या कृपाप्रसादें त्यानें आसपासचे ठाकूर लोकांस जिंकून, तो त्यांचा राजा झाला. भगवंताची वाणी खोटी होते, परंतु सज्जनवाणी कधींही खोटी होत नाहीं. असो. सूरजपालानें सिद्धाज्ञेप्रमाणें सूर्यकुंड विस्तृत करून, पक्कें मजबूत चिरेबंदी बांधून, गोपाचलावर किल्लाही बांधिला. या किल्ल्यास गोपगड नांव ठेवून, त्याचे खालीं नजीकच ग्वाल्हेर शहर [गोपालीयपुर] वसविलें. पुढें ३६ वर्षें या किल्ल्यावर राज्य केल्यावर तो मरण पावला. त्याच्या वंशांत रसिकपाल, नरहरपाल, अमरपाल आदिकरून ८३ पुरुषांनीं एकंदर ९८९ वर्षें राज्य केलें.

शेवटच्या बुधपालाचा मुलगा तेजपाल हा गर्विष्ठ असून, ईश्वर, साधुसंत व स्वधर्म इ. गोष्टींविषयीं फार नास्तिक

ओर्ट्हार्डे
१९५५

होता. ह्मणजे संसारांत दिसणारें सौख्य खरें, व स्वर्गसुख मिथ्या असें त्याचें मत होतें. त्यास कोणीं असें सांगितलें कीं, श्रीग्वालिपासिद्धांच्या कृपाप्रसादानें तुमचा पूर्वज शूरसेन यास राज्यपद मिळून, सूरजपाल हें नांव ठेविलें गेलें. तो नास्तिक असल्यामुळें त्यास ही गोष्ट मिथ्या वाटली, व त्यानें त्या नांवाविषयीं तिरस्कार दर्शविला. इतकेंच नव्हे तर, त्या अविचाऱ्यानें उन्मत्त होऊन, भरदरबारांत प्रासादिक पाल नांव रद्द करून, आपणास तेजकर्ण नांव ठेवून घेतलें, व 'तेजकर्ण महाराज' या नांवानें कागदोपत्रीं लिहिण्याचा मांडलिक लोकांकडे हुकूम जारी केला; त्यावरून तो सर्वांच्या मनांतून अगदीं उतरला. परंतु काय करितात बिचारे! सत्तेपुढें शहाणपण चालत नाहीं. त्या दिवसापासून त्याच्या ऐश्वर्याचा पायाच खचला. थोडक्याच वर्षांत त्याजवर अनेक प्रबल शत्रू चालून येऊन, त्यांनीं त्यास अगदीं जर्जर करून सोडिलें, व प्रत्येक लढाईत त्याचा पराभव होत गेल्यामुळें, अखेर अखेर 'द माय धरणीठाय' असें त्यास झालें. तेजकर्णास जयपूरच्या राजानें आपली कन्या दिली होती. जयपूरच्या राजास पुत्र नव्हता. त्यावेळीं जामाताची झालेली दुर्दशा सासऱ्यास कळून, त्यानें विचार केला कीं, आतां आपण जांवयास आश्रय न द्यावा तर कन्येची अतिदुर्दशा होणार. नवऱ्यामागें पळतां पळतां महान् विटंबना तिला भोगावी लागेल, व आपणास मुलगाही नाहीं. तरी जांवयास आश्रय देण्यांत सर्व ठीक

होईल. असें जाणून, त्यानें तेजकर्णास 'तुम्ही येथें येऊन राज्य करीत असल्यास आह्मी तुह्मांस देतों.' ह्मणून कळविलें. तें तत्काळ त्यानें मान्य करून तो जयपुराकडे पळून गेला. मूर्खच तो, पदभ्रष्ट होऊन श्वशुरगृहीं त्यानें वास केला. सारांश, सज्जनवाणी खोटी होत नाहीं. जर तेजकर्णानें प्रासादिक पाल नांव रद्द केलें नसतें, तर खात्रीनें त्याचा परिणाम असा झाला नसता. परंतु 'विनाशकाले विपरीत बुद्धिः' असो. पुढें किल्लयाचें 'गोपगड' नांव बदलून 'ग्वाल्हेर किल्ला' नांव पडलें; व त्यावर रामदेव प्रहार नामें राजा राज्य करूं लागला. ह्याच्या वंशांत परमालदेव, सालंदेव आदिकरून एकंदर ७ पुरुष होऊन, त्यांनीं सुमारें १०२ वर्षें राज्य केलें. त्यांतील शेवटचा राजा परमालदेव होता. दिल्लीचा बादशाहा शमसुद्दिन अल्टमष यानें या राजाबरोबर लढाई केली. तींत राजाचा पराभव होऊन, किल्ला बादशाहास मिळाला. पुढें दिल्लीस अल्लाउद्दीन बादशाहा होईपर्यंत किल्ला यवनांकडे होता. अल्लाउद्दीन बादशाहाचे पदरचे सरदार परमालदेव व अधरदेव हे उभय बंधु तवर ठाकूर ज्ञातीय मोठे शूर होते. हे किल्लासंरक्षणार्थ त्याजवर राहत असत. एकदां अतिपर्जन्यवृष्टि होत असतांना परचक्र येऊन, त्यांत हे जिवावर उदार होऊन लढले, व नेहमीं आपल्या कामावर हाजीर असतात. असें पाहून बादशाहास मोठा आनंद झाला, व त्यानें कांहीं बक्षीस मागण्याविषयीं त्यांस आज्ञा

केली. परंतु त्या वेळीं आपला उद्देश न कळवितां पुढें दुसरे वेळीं किल्ला आह्मांस बक्षीस द्यावा, अशी उभय बंधूंनीं बादशाहाजवळ विनंति केली. त्याप्रमाणें त्यानें उभय बंधूंस किल्ला बक्षीस दिल्याबद्दल परवाना भरदरबारांत लिहून दिला. तो घेऊन ते किल्यावरील मुख्य अंमलदार जो सय्यद नामें होता, त्याजकडे जाऊन किल्ला मागूं लागले. त्याचे मनांतून तो द्यावयाचा नव्हता. शेवटीं सय्यदास उभय बंधूंनीं मेजवानी करून त्यांत ठार मारिलें, व किल्ला घेतला. ह्यांच्या वंशांत विरमदेव, नरसिंगदेव, डोंगरसिंग, किरतसिंग, कल्याणसिंग इ० पुरुष झाल्यावर पुढें राजा मान हा राज्य करूं लागला. यानें मानमंदीर नांवाची इमारत किल्ल्यावर बांधिली. हा राजा महान् कीर्तिमान झाला. एकदां अरण्यांत फिरत असतां यानें एका ठाकूराची कन्या महान् बलाढ्य पाहिली. तिनें जंगली रेड्याच्या तडाक्यांत न सांपडतां त्यास आपल्या पोरखेळांत शिथिलगात्र करून टाकिलें होतें. तिला मान राजानें विचारिलें कीं, तूं इतकी बलवान कशानें झालीस? तिनें उत्तर दिलें, मी रायीतलावाचें पाणी पितें ह्मणून हें सामर्थ्य मला आलें आहे. राजानें विचारिलें, तूं माझी स्त्री होशीलकाय? तिनें हो ह्मटलें, परंतु, मला रायीचें पाणी पिण्यास मिळालें पाहिजे; अशी तिची अट होती. ती राजानें मान्य करून, तिजसमागमें लग्न केलें. व तिला राहण्यास गुजरीमहाल नांवाची इमारत बांधून, त्यांत रायीचें पाणी

नळानें नेऊन सोडिलें. ही इमारत अद्यापि किल्ल्यावर आहे. मानवंशांतील अखेरचा राजा विक्रमाजित हा राज्य करीत असतां, दिल्लीचा बादशहा इब्राहिम लोदी ह्यानें आपला सरदार अजम हुमायून ह्यास स्वारी करून ग्वाल्हेर किल्ला घेण्याकारितां पाठविलें. त्यानें हल्ला करून महा प्रयासानें किल्ला घेतला, व विक्रमाजितास कैद करून बादशहाकडे नेलें. बादशहानें त्यास कैदेंतून सोडून शमसाबाद नांवाचा परगणा जाहगीर दिला. परमालदेवापासून विक्रमाजितापावेतों एकंदर १० राजे होऊन, त्यांनीं सुमारें २०९ वर्षे राज्य केलें. लोदी वंशांतील पुरुष दिल्लीस बादशहा असतांना त्याजवर बाबरानें काबूलांतून येऊन स्वारी केली. प्रसिद्ध रणभूमि पानिपत येथें लढाई होऊन त्यांत बादशहा व विक्रमाजित दोघे ठार मारले गेले. विजयी बाबरानें रहीमदादखां नांवाचा आपला सरदार ग्वाल्हेर किल्ल्यावर पाठविला. पुढें कांहीं हिंदु व कांहीं यवन सरदार दिल्लीहून किल्ल्यावर आले. पुढें विठ्ठलराव बहादूर नांवाचा मराठा किल्ला घेण्याविषयीं प्रयत्न करूं लागला. त्यावेळीं किल्ल्यावरील व इतर आसपासचे हिंदु लोकांनीं विठ्ठलराव ह्याचे स्वाधीन होण्यापेक्षां गोहदराणा भीमसिंग ह्याचे स्वाधीन व्हावें, हें बरें, असें जाणून, राण्यास मदतीस्तव बोलावून, त्यांनीं त्याच्या साह्यानें विठ्ठलरावाचा मोड केला, व किल्ला भीमसिंगास दिला. भीमसिंग वारल्यावर त्याचा पुत्र ह्या किल्ल्यावर राज्य करीत असतां,

विठ्ठलरावानें पुनः हल्ला केला, त्यांत किल्ला हस्तगत झाला नाहीं. तथापि, किल्ल्यावर विठ्ठलरावाचें एक ठाणें रहावें असा उभयपक्षीं तह झाला. ठाणें न ठेवण्याबद्दल कुरकुर पुढें चालली होती. शेवटीं, गोहदराण्यानें इंग्लिशांची मदत घेऊन विठ्ठलरावाचा अगदीं मोड केला, जनरल पोफाम साहेब यानें युद्धांत किल्ला जिंकून तो गोहदराण्याच्या हस्तगत केला. पुढें इ. स. १७८२ सालीं श्रीमत्प्रतापकेसरी महादजी शिंदे यांनीं गोहदराण्याशीं युद्ध करून किल्ला घेतला, व अंबाजी इंगळे यास किल्ल्यावर सुभेदार नेमिलें. अंबाजी इंगळे यांनीं कंपनीसरकारास किल्ला देण्याचें [illegible]त्कारें दर्शविलें होतें. परंतु अंतस्थ मानस देण्याचा [illegible]न, त्यानें किल्लेदारासही तसाच हुकूम दिला होता. ता. ५ फेब्रुवारी सन १८०४ इ. रोजीं कंपनीसरकारांनीं हल्ला करून किल्ला घेतला. सर जॉन मालकम साहेबांचें मत होतें कीं, किल्ला शिंद्यांकडेसच रहावा. परंतु, मार्किस आफ वेलस्ली साहेबांनीं गोहदराण्यास किल्ला देण्याबद्दल वचन दिलें होतें. त्यामुळें किल्ला शिंद्यांस न मिळतां राण्यास मिळाला. त्यावेळीं श्री. दौलतराव महाराज ह्यांना फार नाखुशी झाली. पुढें इंग्रज, व शिंदे यांत तह होऊन मालकम साहेबांमार्फत किल्ला शिंद्यांस मिळाला. तो इ. स. १८५७ पावेतों त्यांजकडेस होता. ह्याच वर्षी हिंदुस्थानांत शिपाई लोकांनीं मोठें भयंकर बंड केलें. त्यावेळीं इंग्रजांनीं कांहीं कारणावरून किल्ला आपल्या ताब्यांत ठेविला. तथापि

त्याजवर शिंदे सरकारचा हक्क आहे, हें दाखविण्याकरितां किल्ल्यावर त्यांचें निशाण होतें. पुढें इ. स. १८८६ सालीं शिंदे सरकारचे झांशी वगैरे प्रांत इंग्रजसरकारांनीं आपणाकडे घेऊन त्यांच्या मोबदला हा किल्ला व मुरार छावणी श्री. जयाजीराव महाराज शिंदे ह्यांना परत दिली. तेंव्हांपासून हा किल्ला पूर्ण स्वामित्वानें शिंदे सरकारांकडे आहे. या किल्ल्यावर इंग्रज सरकारांनीं आपलीं सोल्जर्स लोकांचीं पायदळ पलटणें राहण्याकरितां, मोठमोठ्या इंग्लिश पद्धतीच्या इमारती बांधिलेल्या हल्लीं कायम असून, त्यांत शिंदे सरकारची कांहीं फौज राहत आहे, व बाकीची फौज मुरार छावणींत राहत आहे. या किल्ल्यास हल्लीं उत्तरेस ग्वाल्हेर दरवाजा, दक्षिणेस लष्कर दरवाजा. व पश्चिमेस बुधगांव दरवाजा. असे तीन असोन, पहिल्या दोन दरवाजांनीं किल्ल्यांत जाण्यायेण्याबद्दल कायदा ठरलेला आहे, व तिसरा दरवाजा, बऱ्याच वर्षांपासून बंद केला असून, तो न उघडण्याविषयीं त्याजवर शपथपूर्वक लेख लिहिला आहे; असें ह्मणतात. ह्या किल्ल्यावर जैन लोकांच्या पारसनाथ देवाच्या विशाळ मूर्ति डोंगर कोरून बनविलेल्या, व त्या लोकांचीं देवळें, हल्लीं कायम आहेत. तरी याजवरून ह्या किल्ल्यावर जैन लोकांचें राज्य मागें झालें होतें, हें स्पष्ट होतें. ह्या किल्ल्यावर पीरस्थान, हिंदु देवस्थान, जैनदेवस्थान, अशा निरनिराळ्या धर्मांचीं देवळें असल्यानें याजवर एकप्रकारची चित्र विचित्र शोभायुक्त भूमि

म. ५. २००



मराठी ग्रंथ संग्रहालय

होऊन ती मानवमनोरंजनास विशेष साह्यकारी होते; ह्या किल्ल्यावर श्रीमत् सज्जनावसंत श्रीग्वालिपासिद्धांचें मंदीर श्री सूर्यकुंडाजवळ असून श्रीची तपश्चर्येची जागा ग्वाल्हेर दरवाजाजवळ आहे. ह्या श्रीसिद्धांस भाविक लोक श्रीगालवऋषि समजतात.

ह्या किल्ल्यावरील हवा स्वच्छ, शुद्ध, थंड व निरोगी आहे. त्याजवर जातां जातां आंतल्या भागाची शोभा पाहून, ती खरोखरच सिद्धभूमि आहे असा मनुष्यास अनुभव येतो. श्रीसूर्यकुंडावर येऊन श्रीमत्ग्वालिपासिद्धांचें मंदीर पाहतांच कसाही मनुष्य असो, तो उल्हासवृत्ति होऊन क्षणभर तल्लीन स्थितींत देहभान विसरतो. श्रीसिद्धांचें दर्शन, श्रीसूर्यकुंडस्नान, व किल्ला पाहणें, ह्यांजबद्दल सरकारांतून परवानगी घ्यावी लागत होती. परंतु हल्लीं, श्री. माधवराव महाराज सा. ह्यांनीं, एक आणा फी दिल्यावर पाहिजे त्या मनुष्यास, वरील गोष्टी करण्यास आंत जाऊं देण्याचा कायदा ठरविला आहे. हा कायदा लोकांस सोयकर असल्यामुळें, बहुत लोक जातात. ह्या किल्ल्याचे उत्तरेस प्राचीन राजधानी ग्वाल्हेर शहर हल्लीं अगदीं मोडकळीस येऊन, किल्ल्याचे दक्षिण बाजूस अर्वाचीन राजधानी लष्कर शहर भरभराटीस आलें आहे. तथापि सरकारी कामांत ' रियासत ( स्टेट ) ग्वालियर ' असें लिहिण्याचा परिपाठ आहे. ह्या दोन्ही शहरांतील सर्व घरें दगडी आहेत. ह्या देशांत इमारती लांकडाचीं रानें नसून, मोठमोठे दगडांचे डोंगर

आहेत. त्यांतून, इमारतीला लागणारे खांब, सरे, आडें, पाट, चौकटी, इ० सर्व प्रकारचें सामान तयार करण्याकरितां लहान मोठे दगड काढितात व दारें, खिडक्या आणि खुंट्या ह्या जिनसा लांकडी केलेल्या त्या दगडी इमारतीस लावितात. येथील जयेंद्रभुवन आदिकरून इमारती चांगल्या व पाहण्यालायक आहेत. ह्या ग्वाल्हेर प्रदेशांत, प्रसिद्ध तुकाराम एकनाथा सारखे वैराग्यज्ञानसंपन्न श्रीसरभंगनाथमहाराज, नागागोविंददास, अण्णामहाराज, मंगळमूर्ती, आबामहाराज, ढोलीबुवा, देवमहाराज इ० हिंदुसाधु; व श्रीमनसूरसाहेब, कपूरशहा, मेहेराबशा बुचेशा इ० अवलीया फकीर झाले. ह्या सर्वांचा इतिहास येथील सरकारांत लेखी असून, ह्यांच्या नांवानें चालू संस्थानांस खर्चाबद्दल सरकारांतून वर्षासनें व नेमणूकाही मिळत आहेत. श्री मनसूरसाहेब अवलीयानीं श्री. महादजी महाराजांस (पाटील बुवा ) आपला प्रसाद ह्मणून भाकरी दिली होती. ती महाराजांनीं आपल्या पदरांत घेऊन, घरीं आल्यावर एका डब्यांत बंद करून, तो डबा आपल्या देवघरांतील देव्हाऱ्यांत ठेविला, व नित्य त्याची पूजा करण्याचा प्रघात पाडिला, तो अद्मून चालू आहे. ह्या ग्वाल्हेर प्रदेशाची भाषा हिंदुस्थानी, व हिंदी आहे. बादशाही अमलांत येथें फारशीभाषा चालत होती. हल्लीं येथें ज्युडिशीयल खात्याचीं कामें उर्दू व फारशी भाषेंत असून, मुलकीखातें मराठी भाषेंत ठेविलें आहे. तथापि, मराठी लिहिण्यांत दरबारी फारशी शब्दांची

जास्त योजना करितात. त्यामुळें एथील दरबारच्या मराठी भाषेचा ' धडहिंदुना धडमुसलमान ' असा प्रकार झाला आहे. श्रीछत्रपति शिवाजी महाराजांनीं दरबारी फारसी शब्दांचा पंडिताकडून कोश ( राज्य व्यवहार ) तयार करवून, दरबारी लेखनांत फेरफार केला. तो राज्यव्यवहार कोश हल्लीं प्रसिद्ध आहेच. तरी त्याजवरून येथील व्यवस्थेंत फेरफार केल्यास मराठी भाषेस एकप्रकारें उत्तेजन दिल्या सारखें होईल. ह्या किल्ल्यावर नित्यशः दिवसा बारा वाजतां १, व रात्रौ ८ वाजतां १ अशा २ तोफा सुटून जणूं त्या सुज्ञांस श्रीग्वालिपासिद्ध व सूरजपाल ह्या महा विभूतींची, आणि अज्ञान्यांस ह्या प्रचंड गोपगडाची ( ग्वाल्हेर किल्ल्याची ) आठवण करून देतात.

# मणि-काव्य.

**चाल-लावणी** ( जाउं नकारे विषयाटविंची. )

काय सांगु सखि हर्ष वर्षला, गालवपुर-भुवनीं ॥
श्रीमन्माधव नृपवर विलसे, हरिजणुं अमरगणीं ॥ ध्रु० ॥
ईशकृपाही न्यायें केवळ, हस्तिनपुर-तख्तीं ॥
बादशहा ते हिंदुस करिती, धर्मच्युत सख्तीं ॥ १ ॥
तैमूर्लंगें नरहत्यादिक, केल्या दुष्करणी ॥
सोमनाथ करि भग्न दुष्टतम, महंमूद-गिझनी ॥ २ ॥
श्रीविश्वेश्वर-काशीराजा, बंधन करुं पाहे ॥
अलमगिरें त्या शिवालयावर, मशीद केली हे ॥ ३ ॥
निगमागमातिलोप, विप्रभू, त्रस्त महा गाई ॥
होमागारीं गोधव घडले, हर ! हर !! आगाई !!! ॥ ४ ॥
किति सांगु सखे यवनचरित तें, इतिहासग्रंथीं ॥
पुरे, पुरे, रोमांच कंप, हे अंगावर येती ॥ ५ ॥
वदतें गीता जेव्हां होइल, सद्धर्म-ग्लानी ॥
अवतारातें घेई भगवान्, तारक हिंदुजनीं ॥ ६ ॥
काय सांगु सखि हर्ष वर्षला इ०- ( १ )

श्रीशिवअंशें शहाजिउदरीं, शिवाजि शिवनेरीं ॥
प्रगटे हर्षित महाराष्ट्र जणुं, हरिच्या अवतारीं ॥ १ ॥
कोंडदेवसुतदादोजी दे, नृपशिक्षण राया ॥
अश्वारोहण, धनुष्यविद्या, मल्लांसमकाया ॥ २ ॥

षोडशवर्षात्मकशिवमूर्ती, दंडकवानें राजे ॥
तयीं पासुनी महाराष्ट्र त्या, नांव अहा साजे ॥ ३ ॥
कंक, फसल्कर, मालुसरे हे, मित्र शिवाजीचे ॥
देखुनि त्यांना थरथर कांपति, भूप विजापुरचे ॥ ४ ॥
विजापूरनृप पाठवि योद्धा, शिवाजिमोडार्थ ॥
अफजुल–हिरण्यकशिपुस झाला, शिवनरहरिसार्थ ॥ ५ ॥
चाकण–तोर्णा–पुरंदरादिक, किल्ले सर अवनी ॥
स्वतंत्रसाम्राज्याचें स्थापन, करि शिववीरमणी ॥ ६ ॥
काय सांगु साखि हर्ष वर्षला इ० ( २ )
गागाभट्टें अभिषेकोत्तर, रायगडीं गादी ॥
अष्टप्रधान योजि भूप जे स्वराष्ट्र–हितवादी ॥ १ ॥
त्यांत पेशवे, पंतअमात्याहि, सचीव मंत्रि, सुमंत ॥
न्यायाधिश, सेनापति, पंडित, प्रत्येकीं पद पंत ॥ २ ॥
श्रीशिवअंकितमुद्रा प्रसवे, टांकसाळ–गंगा ॥
श्रीवरशिवनृपनिशाण फडके, महाराष्ट्र–रंगा ॥ ३ ॥
श्रीमत्स्वामीरामदासगुरु, समर्थ–पदपद्मीं ॥
नम्र शिवाजी राज्य आर्पि त्या, अक्षयसुखसद्मीं ॥ ४ ॥
विरक्त आह्मी वीर क्षत्रिय, असशी तूं पाहे ॥
गोद्विजधर्मावनीं सर्वदां, परमदक्ष राहे ॥ ५ ॥
वदे स्वामि काषायवस्त्र दे, ध्वजाशिखरस्थानीं ॥
विलसो राजे चंद्रसूर्य तों, अक्षयसुखदानी ॥ ६ ॥
काय सांगु साखि हर्ष वर्षला इ० ( ३ )
श्रीमत्स्वामीवरप्रदानें, तद्वंशीं गाजी ॥
राज्यधुरंधरभूपति झाले कमलादल राजी ॥ १ ॥

तच्चरितोदधि अपरंपारचि काय कथूं सजणी ॥
अल्प तोत्रवो समय नसे मज, रसज्ञसुजनगुणी ॥ २ ॥
असो; शिवाजी गुडघीयोगें, सोळाशें-ऐंशीं ॥
मृत्यु पावले! भूपा सोडिल, कालगती कैशी? ॥ ३ ॥
श्रीशिवनंदननृपसंभाजी, क्रूरमहाव्यसनी ॥
वधि मातासर्दारा कलुषा, प्रधान करि अगुणी ॥ ४ ॥
नृपप्रधाना औरंगजेबें, तुलापूर-भुवनीं ॥
एकुणनव्वादें वधिले कैदी, करि तत्सुतरमणी ॥ ५ ॥
कनिष्ठबंधू-राजारामा, राज्याच्या स्थानीं ॥
स्थापुनि केलें सरदारें तैं, राष्ट्रसूत्रधर जनीं ॥ ६ ॥
काय सांगु सखि हर्ष वर्षला ( ४ )

श्रीमद्राजाराम करी मग, नृपपुर सातारा ॥
निराजितनयप्रल्हादातें, प्रतिनिधि पंतवरा ॥ १ ॥
घोरपडे सर्दार शूर जो, नामें संताजी ॥
सन्मानें त्या निशाण नृप दे, जरिपटका-वाजी ॥ २ ॥
औरंगजेबें यत्न बुडाया, महाराष्ट्र अवनी ॥
केला परि सत्राशें सातीं, गेला यमसदनीं ॥ ३ ॥
पुढें जाहला शाहूराजा, काकी करि युद्ध ॥
बंधमुक्त जो शिवसुतसुतशिव, शिववंशींशुद्ध ॥ ४ ॥
सपुत्रतारापराभूत जी, स्वतंत्र करि राज्य ॥
स्मारक कोल्हापुर अजि विलसे, महाराष्ट्रिं पूज्य ॥ ५ ॥
शाहूतारासमरीं स्त्रीनें सुत शाहूचरणीं ॥
अर्पियला तो फत्तेसिंगनृप, अक्कलकोटभुवनीं ॥ ६ ॥
काय सांगु सखि हर्ष वर्षला इ० ( ५ )

धन्य, धन्य, तो शाहूराजा, रंकातें राव ॥
रावातें ही रंक कराया, ज्याचा अनुभाव ॥ १ ॥
बहिरोपंता कडुनि पेशवे, पद नृप काढि तदा ॥
विश्वनाथसुतबाळाजीतें, सत्राशेंचौदा ॥ २ ॥
संवत्सरिं निजराष्ट्रसूत्र दे, प्रधानकरिं सजणी ॥
ऐषारामीं मग्न घालवी विलासिं दिनरजनी ॥ ३ ॥
एक उणा त्या साडेसत्रा–शतकीं तैं झाला ॥
शाहूमृत्यू हर ! हर ! ! सखये, महाराष्ट्र रडला ! ॥४॥
भूपनिपुत्रिक तारानातू–रामराय बसले ॥
नृपसिंहासनिं शूरवीर जे शिवसुतसुतज भले ॥ ५ ॥
सनसत्राशेंसत्त्याहत्तरिं, दुःखी हो अवनी ॥
रामरायनृपमृत्यु जाहला, हर ! हर ! ! हे सजणी ॥ ६ ॥
काय सांगु सखि हर्ष वर्षला इ० ( ६ )
निपुत्रिकत्वामुळें तयाच्या, सिंहासनिं राज– ॥
अंकीं दत्तक देउनि विलसे, शाहुमहाराज ॥ १ ॥
सन अठराशेंआठांमधिं तो, गेला कैलासीं ॥
अवतरला जो छत्रपती त्या, भेटे सांबाशीं ॥ २ ॥
मागें त्यांचे सुतवर बसले, सिंहासनिं सिंह– ॥
सदृश शूर परि दुर्विधि–पीडित, जे प्रतापसिंह ॥ ३ ॥
पंतपेशवा तयांस ठेवी, बंदीं दशवर्ष ॥
मुक्त करी दे इंग्रज गादी, नृपमानसिं हर्ष ॥ ४ ॥
अठराशेंएकोणचाळिसीं, फितुराचा दोष ॥
भूपावर इंग्रेज ठेवि करि, पदभ्रष्ट त्यांस ॥ ५ ॥

अनुज शहाजी भूप होय त्या पुत्राची वाणी ॥
नववर्षांतीं राज्य इंग्रजां, करिं गेलें सजणी ॥ ६ ॥
काय सांगुं सखि हर्ष वर्षला इ० ( ७ )

## पेशवे.

श्रीवर्धनचा जो कुळकर्णी, बाळाजी नामें ॥
कोंकणस्थ त्याप्रती धनाजी, कारकून—कामें ॥ १ ॥
सांगे. नंतर धनाजिमृत्यू, होतां बाळाजी ॥
अकलहुशारी पाहुनि त्यांतें, शाहू नांवाजी ॥ २ ॥
सनसत्राशेंचौदामधिं तो, कथिला अधिकार ॥
मुखत्यारीनें राज्य करीती, तद्वंशीय—नर ॥ ३ ॥
सय्यदबंधू मदत मागती, शाहूनृप—पायीं ॥
भूपाज्ञेनें ससैन्य युद्धा, बाळाजी जाई ॥ ४ ॥
फिरुक्शरातें ठारमारि करि, सय्यदांस विजयी ॥
बाळाजी सरदेशमुखी घे, चौथाई बाई ॥ ५ ॥
सनसत्राशेंविशीं जाहला, सासवडीं सजणी ॥
बाळाजीचा अंत तया सुत, बाजी, चिमण गुणी ॥ ६ ॥
काय सांगु सखि हर्ष वर्षला इ० ( ८ )
पुढें पेशवे बाजी झाले, वसूल मोकासा ॥
खानदेशि घे, स्वारि निजामीं, प्रांत करी खाल्सा ॥ १ ॥
दोहाप्रेषकचतुरसालनृप,—रक्षणिं दक्षासी ॥
मुलूख लक्षद्वयद मिळे शतसत्रातेहातिसीं ॥ २ ॥
बाजिस्वारी जंजीरीं शत, सत्रापस्तीसीं ॥
दिल्लीनृप करि नमुनि तहा शतसत्राछत्तीसीं ॥ ३ ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय

स्वारी पोर्तुगिजांवर करि शतसत्रा–सदतीस ॥
साष्टीकिल्लानिशाणि झळके, सुंदर भूपयश ॥ ४ ॥
ज्यास निजामें दिधलें होतें, साह्यवचन बाई ॥
तो दाभाडे त्रिंबक मेला, बाजिकरीं दुभई ॥ ५ ॥
बाजीबंधूचिमणाजी घे, पोर्तुगिजां कडुनी ॥
सत्राशेंएकोणचाळिसीं, किल्ला वसइरणीं ॥ ६ ॥
काय सांगु सखि हर्ष वर्षला इ० ( ९ )

इराणनृपवर– नादिर्शाहा, दिल्लीची स्वारी ॥
बादशहातें कैदकरी दश-सहस्रजन मारी ॥ १ ॥
धनिक–जनातें लुटुनि सुमारें, सत्तरकोट रुपे ॥
नेई हर ! हर !! अधमनेत्रिं हा, हिंदुस्थान खुपे ! ॥२॥
तक्तनाशिन करि बादशहातें, पुन्हां इराणीं तो ॥
जाई; दुष्ट महाधम सखये, काळहि ज्यास भितो ॥४॥
सांप्रतकाळीं हिंदुस्थानीं, महाराष्ट्र–राजे ॥
प्रसिद्ध शिंदेहोळकरादी, गायकवाड तिजे ॥ ४ ॥
श्रीमद्बाजीरावपेशवे–कारकिर्दि झाले ॥
सरदारत्रय उत्कर्षातें, पावति बाहुबळें ॥ ५ ॥
शिंदेकुलिं राणोजी होळ्करिं, हो मल्हारमणी ॥
गायकवाडी दमाजी रूपें, त्रिमूर्ति हा अवनी ॥ ६ ॥
काय सांगु सखि हर्ष वर्षला इ० ( १० )

नर्मदातटीं गाजी–बाजी,–मृत्यु सखे झाला ॥
सनसत्राशेंचाळिससालीं, जनपद हळहळला ॥ १ ॥
बाळाजी, रघुनाथ, जनार्दन, यवनी–समशेर ॥
चार पुत्र त्या बाजीरावा, असति बहादूर ॥ २ ॥

पैकीं अग्रज नामें नाना, पंत–स्थानें बसे ॥
बापूनाइकपक्षपातिनर,–रघुसंकेत फसे ॥ ३ ॥
नानाशीं मग वैर मांडिलें, रघुरावें चुरसें ॥
श्रीमच्छाहू मध्यस्थी करि, तंटा मिटवि रसें ॥ ४ ॥
नानाज्ञेनें सेनानायक, झाले रघुनाथ ॥
रावसदाशिव चुलतबंधु दे, राजकार्यीं साथ ॥ ५ ॥
नानासाहिब–कारकीर्दि तें, पुणें राजधानी ॥
सन सत्राशेंपन्नासामधिं, झालें रत्नखनी ॥ ६ ॥
काय सांगु सखि हर्ष वर्षला इ० ( ११ )
सन सत्राशें त्रेपनसालीं, कर्णाटीं स्वारी ॥
करुनी नानासाहिब खंडणि, वसूल करि सारी ॥ १ ॥
हुबळी–किल्लाशिवध्वजायुत, करि घे श्रीरंग- ॥
पट्टणखंडणिवसूल नाना, विलसे श्रीरंग ॥ २ ॥
सनसत्राशेंपंचावन्नीं, गुर्जर–अजमीरीं ॥
रघुनाथानें स्वारी केली, श्रीजय त्यांस वरी॥ ३ ॥
सन अठराशें अठ्ठावन्नीं, स्वारी पंजाबीं ॥
करि. लाहोरीं अंमल बसला, अरिस पदीं दाबी ॥ ४ ॥
भाऊसाहिब निजामअल्ली, करि रण उद्दीरा ॥
मोड होउनी तोबा ! तोबा ! वदली अल्लि–गिरा ॥ ५ ॥
शरण येउनी तहामधीं दे शाहूसुत–चरणीं ॥
भू बासष्टां लक्षांची शतसत्रासाठ सनीं ॥ ६ ॥
कायसांगु सखि हर्ष वर्षला इ० ( १२ )

मराठी ग्रंथ संग्रहालय

सनसत्राशें एकसष्टामधिं, लढाइ पानपतीं ॥
घोर जाहली शब्द ऐकतां, गर्भपतन होतीं ॥ १ ॥
तींत रावविश्वास सदाशिव-भाऊ मल्हार- ॥
राव दमाजी तैसे शिंदे जनकोजी शूर ॥ २ ॥
बुंदेले गोविंदपंतही, होते सरदार ॥
शूर मराठे विरुद्ध अहमद, अफगाणेश्वर ॥ ३ ॥
विश्वासराव जखमी पडले, भाउ शिरे युद्धीं ॥
पुनरपि दिसला नाहीं उपजे, काशि तया बुद्धी ॥ ४ ॥
सहस्रपंचावन्न पायदळ, सहस्रपंचदश- ॥
स्वार शतद्वय तोफा होत्या मृत्यु करी विवश ॥ ५ ॥
समरीं झालीं ठार मनुष्यें, लक्षद्वय सजणी ॥
हर ! हर ! सखये दुःखसागरीं, मग्न होय अवनी ॥ ६ ॥
काय सांगु सखि हर्ष वर्षला इ० ( १३ )
सनसत्राशेंएक्सष्टामाधिं, पर्वतिसत्सद्मीं ॥
नानासाहिब देहार्पण करि, शंभूपदपद्मीं ॥ १ ॥
त्यास पुत्र विश्वास, रमाधव, नारायण तीन ॥
पैकीं अग्रज पानपतीं हत, प्रजा ज्यास लीन ॥ २ ॥
पुढें पेशवा रमानाथ जो, बाल्यावस्थि असे ॥
चुलता त्याचा रघनाथ करि, कारभार सुरसें ॥ ३ ॥
मोंगलाश्रया करी आपणा, राज्य मिळायासी ॥
परी रमाधव समरीं धरुनी, कैद करी त्यांसी ॥ ४ ॥
ज्ञानी निस्पृह रामशास्त्रि तो, न्यायासनीं विलसे ॥
धन्य माधवें योग्याचि केलें, गुणि गुण जाणतसे ॥ ५ ॥

पंतभानु—बाळाजी नाना,—फडणिस जनवदनीं ॥
औट शहाण्यां नरांमधीं हा, अर्धचि गे सजणी ॥ ६ ॥
काय० ॥ १४

हैदरअल्ली म्हैसुरनृप जो, श्रीमाधव—निकरीं ॥
त्रस्त होउनी स्वस्थ बैसला, माधव विजय वरी ॥ १ ॥
सनसत्राशेंबाहत्तरिं सति, गेलि रमा स्वधवा— ॥
संगें थेउरगांवीं सखये, धन्य रमा सधवा ! ॥ २ ॥
पुढें पेशवे श्रीनारायण, काका पुतण्यांत ॥
द्वेष वाढला. काका नुमजे, स्वस्त्रीकलहांत ॥ ३ ॥
यास्तव बंदी काकासी करि, नारायणराव ॥
स्त्रीनादें तम लावि कुलातें, दुष्टानंदिधव ॥ ४ ॥
असत्यसाहस—माया योगें, आनंदी अधमे ॥
नीच स्त्री परि मूर्तिमंत तूं, कृत्या सत्य गमे ॥ ५ ॥
काकाकाकीसंमतिनें करि, मस्ती नृपसदनीं ॥
गारदिजन तो रावा दंशी, सुमेरशिंग—फणी ॥ ६ ॥
काय सांगु सखि इ० ( १५ )

सन सत्राशें त्र्याहत्तरच्या, आगष्टीं घडलें ॥
वर्तमान जणु सखये दुःखद,—अंबर कोसळलें ! ॥ १ ॥
अधममहाधम आनंदी स्त्री गोद्विजघातकरी ॥
लावि कुला अंगार एक दुजि, न पाहिली नारी ॥ २ ॥
रावस्त्री तैं गंगाबाई, होती गर्भवती ॥
कारभारिगण ठेवि पुरंदर, गडीं तिला निगुतीं ॥ ३ ॥
ईशदयें तिस पुत्र सवाई, माधवराव धनी ॥
द्वाही गर्भश्रीमंताची, फिरली सकलजनीं ॥ ४ ॥

सन सत्राशें चौऱ्याहात्तरिं हें, वर्तमान घडलें. ॥
चाळीसावें दिवशीं माधव, पंतपदीं बसले. ॥ ५ ॥
राज्य मिळावें ह्मणून दादा, इंग्रजांस नमले ॥
साष्टी, वसई, देतों बसवा, नृपासनीं वदले ॥ ६ ॥
काय सांगु सखि इ० ( १६ )

मुंबइहूनी किटिंग साहिब, ससैन्य ये युद्धा ॥
अनय जाणुनी कलकत्तापति, परतवि बलसुद्धां ॥ १ ॥
सनसत्राशें शाहत्तरिं तह, पुरंदरावरती ॥
पंतपेशवे इंग्लीशांमधिं, झाला उभयमतीं ॥ २ ॥
परंतु पुनरपि युद्ध उद्भवे, हरीपंत फडके ॥
आणि महादाजि शिंदे देती, इंग्रजांस धडके ॥ ३ ॥
सन सत्राशें एकुणऐंशीं, इंग्लिश परिभूत ॥
होउनि गेले स्वस्थानीं करि, हरहर ! रघुनाथ ॥ ४ ॥
सन सत्राशें चौऱ्यांशींमधिं, हताश दुश्चित्त ॥
मृत्यू पावे. कोंपरगांवीं, सेवुनि एकांत ॥ ५ ॥
अधममहाधम एकचि ऐसा दुजा न नर भुवनीं ॥
बाजी, अप्पा, अमृतरावहि, पुत्र तया तीनी ॥ ६ ॥
काय सांगु सखि इ० ( १७ )

हैदरअल्लीपुत्रटिपू जो, हैसुरभूप असे ॥
पंतपेशवे-मुलखीं येउनि जनांस जाचितसे ॥ १ ॥
पंतपेशवे, निजाम, इंग्लिश, तिघे एक झाले ॥
टिपुच्यावरती हल्ला करुनी, जर्जर त्या केलें ॥ २ ॥
शरण येउनी टिपू करी तह, तिघां मान्य होई ॥
मुलूख चाळीस लक्षांचा मग, मराठ्यांस देई ॥ ३ ॥

सनसत्राशेंपंचाण्णव तैं, लढाइ खर्ड्याची ॥
पंतपेशवा निजामास धरि, खोड मोडि त्याची ॥ ४ ॥
मुखत्यारीनें कारभार करि, नानाफडणीस ॥
कबजामाजी भूपा ठेवी, राखि महत्वास ॥ ५ ॥
निरय नको हा मानुनि माधव, कारंजें न्हाणी ॥
तिसन्यामजल्यावरुनि उडी घे,साधी असुहानी ॥ ६ ॥
काय सांगू सखि हर्ष वर्षला इ० ( १८ )
तिसरे दिवशीं मृत्यु पावला; महाराष्ट्र-भर्ता ॥
सनसत्राशेंपंचाण्णवीं जो, गोद्विजसुखकर्ता ॥ १ ॥
पुढें पेशवे रावबाजि ते, दुष्टानंदि-सुत ॥
सन सत्राशें शहाण्णवच्या, डिसेंबरीं होत ॥ २ ॥
रावबाजि मग नानातें करि, कैद ठेवि नगर-॥
किल्यामधिं त्या हर! हर! सखये, कृति ही अनिवार ॥३॥
बंधमुक्त करि नानातें तो, शूर महा शिंदे ॥
कारभारि करि पुनरपि त्यांतें, बाजी शरमिंदे ॥ ४ ॥
नानाफडणिस सनअठराशें, मार्च मधीं मेले ॥
मराठिराज्यांतील चतुरता-रत्न लुप्त झालें ॥ ५ ॥
गादीबद्दल बाजीरावें, महादाजिस वचनीं ॥
रुपये देऊं केले होते, दोन कोटि सजणी ॥ ६ ॥
काय सांगु सखि हर्ष वर्षला इ० ( १९
बाजीरावें मसलत दिधली, लुटणें श्रीमंत- ॥
सावकारजन पुण्यपत्तनीं, शिंदा करि मात ॥ १ ॥
दुष्ट घाडगें सर्जेरावें, करुनि बलात्कार ॥
क्रूरपणानें द्रव्य जमविलें, जनीं हाहाकार ! ॥ २ ॥

बाजीरावें हस्ती-पादीं, विठोजिहोळकरा ॥
बांधुनि वधिलें ऐकुनिया यश-वंत येइ निकरा ॥ ३ ॥
पराभूत ते बाजी शिंदे, सिंहगडीं गेले ॥
तेथुनि वसई इंग्लिशलोकीं, आश्रयास आले ॥ ४ ॥
यशवंत तदा विनायकातें, स्थापी पंतपदीं ॥
धन्य, धन्य, जय वास करी त्या, श्रीयशवंतपदीं ॥ ५ ॥
सन अठराशें-दोनमधीं तह, करिति वसइभुवनीं ॥
इंग्लिश बाजीराव उभयतां, इंग्लिश होत धनी ॥ ६ ॥
काय सांगु सखि हर्ष वर्षला इ० ( २० )
सन अठराशें तीन मधीं तो, पुनरपि बाजि बसे ॥
अष्टलक्ष नेमणूक घेउनि, काशित अमृत वसे ॥ १ ॥
इंग्लिश-लष्कर घोडनदीच्या, तीरीं करि वस्ती ॥
घोडनदी जन हिंदू इंग्लिश शिरूर त्या वदती ॥ २ ॥
क्रूर डेंगळा त्रिंबकजी जो बाजिराव-दूत ॥
मुखत्यारीनें कारभार करि, जनांस मारि जित ॥ ३ ॥
नृपसिंहासनिं बसल्यावरती, बाजि जनांस छळी ॥
इंग्रजांस हांकून लावणें त्र्यंबक लावि कळी ॥ ४ ॥
गायकवाडीखंडणिवादा, पटवर्धन आले ॥
पुण्यास गंगाधरशास्त्री तैं, आंग्लीं अभय दिलें ॥ ५ ॥
बाजिबरोबर वकील गेले पंढरपुर-भुवनीं ॥
वधवी नृप अठराशेंपंध्रीं, त्र्यंबकहातोनीं ॥ ६ ॥
काय सांगु सखि हर्ष वर्षला इ० ( २१ )
सन अठराशेंसत्रामाधिं त्या, नवीन तह झाला ॥
नष्ट-स्वातंत्र्य बाजि झाले, मुलुख मिळे आंग्लां ॥ १ ॥

लढाइ खडकीची सन अठराशें—सत्रासालीं ॥
तींत हरुनिया साताऱ्याची, वाट नृपें धरिली ॥ २ ॥
कोरेगांवीं लढाइ केली, इंग्लिश लोकांनीं ॥
पराक्रमाचें स्मारक दिसतो, रणस्तंभ अजुनी ॥ ३ ॥
स्मीथ मराठा सन अठराशेंसत्रामाधिं समरीं ॥
अष्टीं लढती होय बापुवध, हरीस आंग्ल धरी ॥ ४ ॥
सन अठराशेंअठ्ठामाधिं मग बाजिराव शरण ॥
मालकमातें जाई सखये, राज्या सोडून ॥ ५ ॥
शरणागतास नेमणूक दे, आठलक्ष सजणी ॥
ब्रह्मावर्तीं इंग्लिश ठेवी, विभव सर्व हरुनी ॥ ६ ॥
काय सांगु सखि हर्ष वर्षला इ० ( २२ )

बाजीदूतत्र्यंबकजीतें, खानदेशिं धरुनी ॥
इंग्लिश ठेवी चुनारदुर्गीं, जन्मकैद करुनी ॥ १ ॥
असे पेशवेदरबारामधिं, वकील एल्फिन्स्टन् ॥
जितप्रदेशीं मुख्य होई दे, कैकजनां पेन्शन् ॥ २ ॥
फार चतुर साहेब मराठी, राज्याचा ज्ञाता ॥
पंताश्रितगत—वैभवांसि जो, झाला सुखदाता ॥ ३ ॥
कैकजनांतें जाहगिरी दे, वर्षासनहि किती ॥
देवस्थानें आणि इनामें चालवि पूर्वरिती ॥ ४ ॥
दंगे—धोपे मोडुनि सारे, रयतेला न्याय ॥
देइ; निरंतर बंदोबस्तीं, झिजवी तो काय ॥ ५ ॥
जनोपकारामहत्कृती करि, नानाविध सजणीं ॥
स्मरण करूनी अद्यापी त्या, गाती कीर्ति जनीं ॥ ६ ॥
काय सांगु सखि हर्ष वर्षला इ० ॥ २३ ॥

श्री ग्रंथ संग्रहालय ठाणे नं. ...... ता. ......

# शिंदे

कण्हेरखेडीं पाटिल शिंदे, राणोजीरावा ॥
जयाजि, दत्ताजी, जनकोजी, महादजी छावा ॥ १ ॥
राणोजीच्या पश्चात् झाले, जयाजि भूपवर ॥
नव वर्षे राज्याधिकार करि, विजयशिंगसमर ॥ २ ॥
पुढें भूपती जनकोजी ते, दत्ताजी पडले ॥
पानपतीं मग माहादाजी, सिंहासनिं बसले ॥ ३ ॥
राज्य करी तेहतीस वर्षे, पुत्रापरि पाळी ॥
प्रजा सर्वदा वडगांवीं जो, आंग्लां निर्दाळी ॥ ४ ॥
श्रीमद्दौलतराव भूपती, झाले मग पुढती ॥
मुकुटराव त्या नांव ठेविलें, जनकोजी नृपती ॥ ५ ॥
अलिजॉबहादुर जयाजि नृपती, जिसिएसायगणीं ॥
अग्रेसररणदानशूर जणुं, कर्णचि हा अवनीं ॥ ६ ॥
काय सांगुं सखि हर्ष वर्षला इ० ॥ २४ ॥
तत्सुत युवनृपराजमणी हे, वीरश्री सजणी ॥
श्रीमन्माधवभूपति विलसति, जयेंद्रसद्भुवनीं ॥ १ ॥
त्यांतें राजपदार्हचि जाणुनि, केसर–ई–हिंद ॥
डी, डल्ब्यू, के, बार लष्करीं, पाठवि देउं पद ॥ २ ॥
सन अठराशें चौऱ्याण्णवच्या, डिसेंबरीं पंध्रा ॥
दिवशीं वद्य तृतिया मार्गी, देती अधिकारा ॥ ३ ॥
श्रीस्वामीकर राष्ट्रसूत्रयुत, उत्सव होत जनीं ॥
स्वामिनिष्ठितप्रजामहामह, वर्णी कवि कथनीं ॥ ४ ॥

लेखनसरणी अल्पमती मी, नम्रभाव धरुनी ॥
श्रीमन्माधवचरणीं अर्पण, करितें गोप-मणी ॥ ५ ॥
भावीपुरुषां स्मारक शिंदे; नृपइतिहासखनी ॥
जोडुनि तीतें सुशोभिता करि, विनती ही चरणीं ॥६॥
काय सांगु सखि हर्ष वर्षला इ० ॥ २९ ॥

## श्लोक ( शार्दूलविक्रीडित. )

श्रीमत्थोर सनातना सुरुचिरा, ग्वाल्हेरराष्ट्रीं वली—॥
गादी हो नृपराज-कीरिटमणि, श्रेयस्करा भूतलीं ॥
ऋद्धी, सिद्धि, रमा सदा स्थिर असो, सद्बुद्धि नांदो हृदीं ॥
सत्कीर्ती जगिं शत्रु कीरिट पडो, श्रीमाधवाच्या पदीं ॥ १ ॥
श्रीशिंदेकुलिं माहदाजि नृपती, श्रीमज्जयाजी हिरा ॥
श्रीमन्माधवराव आज विलसे, सिंहासनीं मोहरा ॥
हिंदुस्थानजनां सदा सुखविता, हो भूपचिंतामणी ॥
श्रीभाग्योदय-सूर्य अंबुज धरा, हर्षान्विता साजणी ॥ २ ॥
**श्री**दीनां नृपकल्पवृक्ष धन दे, विप्रांप्रती हो नत ॥
**मा**न्यीं मानक हिंदुभूपहरितें, इंप्रेस मानो नित ॥
**ध**र्में राज्य करो युधिष्ठिर जणूं हर्षों प्रजातोषदा ॥
**व**र्णाया चिटणीस-लेखणि सदा, **श्रीमाधवा**च्या पदा ॥ ३ ॥

## ह्या पुस्तकांतील कित्येक शब्दांबद्दल सूचना.

**गोपाचल**-ज्या डोंगरावर ग्वाल्हेर-किल्ला आहे त्याचें नांव.
**जाड रुमाल**—जैन लोक पाणी काढण्याकरितां ज्या जाड कापडाचा पोहरा करितात. त्या जातीचें (कंतान) कापड.
**गालवपुरभुवन**-ग्वाल्हेर शहर.
**सखि**—लेखणी उर्फ लक्ष्मी ही आपल्या मैत्रीणीस सांगते.

